# पीएमसीचा नदी प्रकल्प फक्त ‘ग्रीनवॉशिंग’ आहे का?

११/२/२०२५

म.न.पा.च्या पुण्यातील नदी-पुनरुज्जीवन योजनांवर महत्त्वाचे मुद्द्दे रोजच वर्तमान पत्रात उपस्थित केले जात असले तरी काही मूलभूत प्रश्न अनुत्तरित राहतात. मूळतः हा प्रकल्प राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेअंतर्गत (National River Conservation Plan) जपानकडून निधी घेऊन “मुळा-मुठा नदी प्रदूषण निर्मूलन प्रकल्प” (PARMM) म्हणून मान्य करण्यात आला होता. मात्र, राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरणाकडे (SEIAA) अर्ज करताना, त्याला “पुणे नदी पुनरुज्जीवन प्रकल्प” म्हणून नव्याने नाव दिले गेले. पुढे छुप्या पद्धतीने त्याला “नदीकिनारी विकास प्रकल्प” (Riverfront Development - RFD) असे नांव दिले. त्यामुळे “प्रदूषण निर्मूलन”चा उद्दिष्ट मागे पडून नदी प्रदूषणाच्या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष होत आहे.

शेक्सपीयरच्या “नावात काय आहे?” या प्रश्नाचे येथे स्पष्ट उत्तर आहे—सर्वकाही. “नदीकिनारी विकास” म्हणजे नदीचे प्रदूषित पाणी स्वच्छ करणे नव्हे, तर फक्त नदीच्या काठावर सजावट आणि सौंदर्यीकरण करणे. प्रत्यक्ष पुनरुज्जीवनासाठी संपूर्ण सांडपाणी संकलित करणारे नेटवर्क, आणि आज आणि भविष्यात सुद्धा संपूर्ण सांडपाणी प्रक्रिया करू शकतील, अशी सक्षम सांडपाणी प्रक्रिया केंद्रे (STPs), या मूलभूत नागरी पायाभूत सुविधा आवश्यक आहेत. हेच मूळ जपान-निधी-प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट होते. कोणत्याही नगर-विकासाची हीच पहिली पायरी सुद्धा आहे. दुसरीकडे, सौंदर्यीकरण आणि लँडस्केपिंग ही पुणे महानगरपालिकेची नेहमीची जबाबदारी आहे—यासाठी तब्बल ₹ ४,७०० कोटीच्या प्रकल्पाची गरज नाही. अशा

प्रकल्पाला पर्यावरण परवानगीची गरजच नव्हती. ०९ ऑगस्ट २०२१ रोजी जलशक्ती मंत्री यांनी राज्यसभेत वंदना चव्हाण यांच्या प्रश्नाला उत्तर देताना हे स्पष्ट केले होते.

मात्र, म.न.पा.ने मूळ प्रदूषण निर्मूलन उपायांकडे दुर्लक्ष करून लोकांचे लक्ष केवळ बाह्य सौंदर्यीकरणाकडे वळवले आहे. आश्चर्य म्हणजे पर्यावरणवादीसुद्धा दिशाभूल झाले आहेत. ०९ फेब्रुवारीच्या आंदोलनाचा घोषवाक्य होता, “झाडे वाचवा, नद्या वाचवा”. जर खरोखर नद्यांवर लक्ष केंद्रित करायचे असेल, तर बोधवाक्य असावा, “सांडपाणी शुद्ध करा, नद्या वाचवा”. नदीकाठची झाडे वाचवली पाहिजेतच, पण ती STP ला पर्याय नाहीत. झाडे हे एक वेगळा, स्वतंत्र मुद्दा आहे.

म.न.पा. म्हणते की, “बाइंडिंग्ज” (engineered embankments) पूर-प्रवण भागांचे संरक्षण करतील. मात्र, हा गैरसमज संपूर्ण जगात फोल ठरत आहे. उत्तम शहरी नियोजनप्रथांनुसार, नद्यांना त्यांचे नैसर्गिक पूरक्षेत्र वापरण्यास जागा देणे हा सर्वोत्तम उपाय आहे. नेदरलँड्समध्ये बाइंडिंग्जच्या उलट “Room for the River” या प्रकल्पांतर्गत नद्यांना नैसर्गिकरित्या पूर येऊ देण्यासाठी जागा निर्माण केली गेली आहे. पुण्यात मात्र (कळत-नकळत धोका पत्कारून) नद्यांच्या काठावर भिंती बांधून एक गुप्त हेतू नक्कीच साध्य होत आहे—पूररेषेतील अनधिकृत बांधकामे अधिकृत करणे, आणि उच्च एफ.एस.आय. घेऊन  गुंतवणूकदारांसाठी महागड्या आणि उच्च-घनतेच्या निवासी प्रकल्पांचा मार्ग मोकळा करणे.

सर्वात मोठा प्रश्न: विश्वासार्हताचा. म.न.पा.ने स्वच्छ सर्वेक्षण रिपोर्ट कार्ड (२०२३) मध्ये पुण्याच्या नद्या १००% स्वच्छ असल्याचे प्रमाणपत्र

मिळवले, जेंव्हा म.न.पा.च्याच वेबसाइटवर त्या अत्यंत प्रदूषित असल्याचे म्हटले आहे! मग डेटा कोणी बदलला? आणि प्रकल्पाच्या बजेट वाढीचा हिशेब काय? त्याच ८२-लाख चौ.मी. क्षेत्रफळासाठी मूळ ₹ २८० कोटींचा प्रकल्प कसा ₹ २,६१९ कोटींवर, आणि नंतर ₹ ४,७०० कोटींवर पोहोचला?

म.न.पा.काही इतर मूलभूत प्रश्नांची उत्तरे सुद्धा देईल का? MPCB (महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ) ने म.न.पा. विरुद्ध प्रदूषणावरील नोटीस बजावली—त्यावर म.न.पा.चे उत्तर काय? नदीकिनारी वय १००-२०० वर्षांची झाडे वाचवण्याचे आश्वासन देऊनही का तोडली जात आहेत? म.न.पा. २००७-२७च्या विकास आराखड्याचा वापर करून नदीकिनारी वाहतूक मार्ग तयार करत आहे का? पुण्यातील अलीकडील GBS (Guillain-Barré Syndrome) रोगाचे प्रदूषित विहिरीच्या पाण्याशी संबंध जोडले गेले होते—म.न.पा.ने त्याची जबाबदारी घ्यावी का? आता नागरिकांनी खरे प्रश्न विचारायला हवे, आणि म.न.पा. ने त्याची उत्तरे द्यायला हवीत.